Date :

||श्री||

२२।०५।२०१४.

सौ. गौरी मॅडम,

रत्नागिरीला जायचे ठरल्यावर नेट वर शोधाशोध झाली. बहीण (वैदेही भडसावळे) म्हणाली तर आपण 'एकांत' मध्ये एक दिवस जाऊ. ठरल्याप्रमाणे सोमवारी निघून मंगळवारी आलो. आम्ही एकूण ८ जण होतो. जागेवर आल्यावरच प्रथम दर्शनी परिसर अतिशय आल्हाददायक व अप्रतिम वाटला. तेव्हाच मनात ठरवले एक दिवस वाढवायला हरकत नाही. येथील कर्मचारी वर्ग अतिशय ~~अग~~ सोज्वळ, मृदुभाषिक व आदबशीर आहे.

घरगुती वातावरण, आपल्या आवडीचे रुचकर व चविष्ट जेवण शांत परिसर, विलोभनीय व नयनरम्य झाडांची मांडणी व निसर्ग बघून मन सुखाऊन गेले. त्यामुळे एक दिवस वाढवण्यास हरकत नाहीच असे वाटले.

* रूममध्ये टि.व्ही नाही हे बघून 'एकांत' हे नाव सार्थकी लागले असे मला वाटते.

धन्यवाद ....

सौ. मिनल मिलींद निमकर
(पनवेल)

22/5/2014

उत्तम, नीटनेटका, स्वच्छ आणि विलोभनीय परिसर, सोज्वळ, तत्पर आणि आदरातिथ्य योग्य प्रकारे करणारी माणसे (स्टाफ).
जेवण आणि स्वच्छ खोल्या. सर्वसोयीयुक्त आहे.
मन प्रसन्न झाले.
नावाप्रमाणे एकांत लाभला.
धन्यवाद.

भडसावळे

(विजयकुमार म. भडसावळे)